अतिक्रमणे

शासकीय पड व गायरान जमिनीवर शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत....

## महाराष्ट्र शासन
### महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: एलईएन-१०९२/प्र.क्र.६५/ज-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ एप्रिल, १९९२.

वाचा :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: एलईएन-१०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१.

परिपत्रक :- वर प्रस्तावनेत नमूद केलेल्या दिनांक २८ नोव्हेंबर १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय पड आणि गायरान जमिनीवरील दिनांक १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० या कालावधीमध्ये मागासवर्गीय व इतर व्यक्तींनी शेतीसाठी केलेली अतिक्रमणे उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या शर्ती व अटींवर दिनांक ३१ मार्च, १९९२ पर्यन्त नियमानुकूल करावीत असे शासनाने निदेश दिलेले आहेत. अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची कार्यवाही करताना शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: एलईएन-१०७८/३४८३/ग-१, दिनांक २७ डिसेंबर १९७८ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये विहित केलेल्या कार्यप्रणालीमध्ये आवश्यक तो फेरफार करून प्रकरणे हाताळावीत असेही शासनाने आदेश दिलेले आहेत.

२. उपरोक्त दिनांक २८ नोव्हेंबर १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करताना आतापर्यन्त शासनाच्या स्पष्टीकरणासाठी खालील मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. त्या मुद्यांबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :-

| मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|
| अ] ज्या शासकीय जमिनी महाराष्ट्र जमिन महसूल[सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे] नियम १९७१ च्या नियम १५[२] प्रमाणे शर्ती व अटींचे उल्लंघन केल्यामुळे सरकारजमा झाल्यानंतर सुध्दा शर्ती व अटींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीच्या ताब्यात अद्यापि असतील तर त्या व्यक्तींची संबंधित कालावधीमधील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे मानून ती अतिक्रमणे दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ च्या आदेशाप्रमाणे नियमानुकूल करता येतील किंवा कसे ? | अ] दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ च्या आदेशातील अटी व शर्तींमध्ये अशी अतिक्रमणे बसत असतील तर ती अतिक्रमणे नियमानुकूल करता येतील. मात्र, त्यांची नोंद दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ च्या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ मधील यादीत झालेली नसेल तर सदर आदेशातील परिच्छेद १० मध्ये निर्देशिलेली कार्यपध्दती अनुसरून या प्रकरणाबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावयाचे आहेत. |

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
21 MAY 1992

Send copies to all

| मुद्दा | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| ब] दिनांक ३१ मार्च, १९७८ रोजी अस्तित्वात असलेली जी अतिक्रमणे २७ डिसेंबर, १९७८ च्या आदेशानुसार अद्यापही नियमानुकूल केलेली नाहीत किंवा अपात्र ठरवूनही दूर केलेली नाहीत ती अतिक्रमणे प्रत्यक्षात दिनांक १ एप्रिल, १९७८ ते १४ एप्रिल, १९९० या कालावधीत अस्तित्वात असल्याने त्यांना २८ नोव्हेंबर, १९९१ च्या आदेशानुसार पात्र ठरत असल्यास नियमानुकूल करता येतील किंवा कसे ? | ब] अशी अतिक्रमणे दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ च्या अटी व शर्तीनुसार नियमानुकूल करता येण्यासारखी असल्यास सदर निर्णयाच्या परिच्छेद १० मधील कार्यपध्दती अनुसरून ही प्रकरणे नियमानुकूल करावीत. |
| क] तलाठयांनी/तहसिलदारांनी यादीमध्ये कळविलेले अतिक्रमणाखालील क्षेत्र व अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींनी प्रत्यक्षात अतिक्रमित केलेले क्षेत्र यामध्ये बरीच तफावत असल्यास अतिक्रमणे नियमानुकूल करताना जमीन प्रदानाबाबतचे जे आदेश काढावे लागणार आहेत त्यामध्ये अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे नियमानुकूल करावयाचे नेमके क्षेत्र कोणते ? | क] यादीमध्ये नमूद केलेले क्षेत्र कमी अगर जास्त असले तरीही प्रकरणे नियमानुकूल करताना जमीन प्रदानाच्या आदेशामध्ये अतिक्रमकाने व्यापलेले नेमके क्षेत्र जमीन प्रदानाच्या आदेशात येणे आवश्यक आहे, जेणेकरून त्या क्षेत्राचे वर्णन तसेच त्यावर होणाऱ्या महसुलाची आकारणी, इत्यादी बाबी जमिनीच्या अभिलेखयांत संपूर्ण तपशिलासह नोंदणे शक्य होईल. अतिक्रमणाखालील प्रत्यक्ष क्षेत्रात तफावत आढळल्यास दिनांक २७ डिसेंबर, १९७८ च्या निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करून अंतरिम स्वरूपाचे आदेश काढण्यात यावेत व त्यानंतर जमिनीची मोजणी व नकाशे तयार करणे, इत्यादी कामे पूर्ण झाल्यानंतर अंतिम स्वरूपाचे जमीन प्रदानाचे आदेश काढण्यात यावेत व त्याप्रमाणे सनद देण्यात यावी. |

३. तेव्हा वरील स्पष्टीकरण सर्व संबंधित महसूल अधिका-यांच्या निदर्शनास जिल्हाधिका-यांनी आणून द्यावे व दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ च्या वर प्रस्तावनेत नमूद केलेल्या शासन निर्णयातील आदेशाप्रमाणे प्रकरणे नियमानुकूल करताना सर्व संबंधितांनी योग्य ती नोंद घेऊन प्रकरणे निकालात काढावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. गो. वर्तक,
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रति